सहायक वनसंरक्षक, गट-अ (कनिष्ठ श्रेणी) या संवर्गात सरळसेवेने नियुक्त होणाऱ्या उमेदवारांना पदस्थापना देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग, मंत्रालय,
शासन आदेश क्र. एमएफएस-२०१८/प्र.क्र.१९/फ-८
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई ४०००३२.
दि. ९ मार्च २०१८.

संदर्भ :- अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (कार्मिक), नागपूर याचे पत्र क्रं- मवसे/निसू/विअ/प्र.क्र.९/१७-१८ /३२९८/कक्ष-९ दि.२३.०२.२०१८

शासन आदेश :-

महाराष्ट्र वन सेवा परिक्षा २०१२ च्या आधारे महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत सहायक वनसंरक्षक गट-अ (कनिष्ठ श्रेणी) या संवर्गात सरळसेवेने नियुक्ती देण्यासाठी शिफारस करण्यात आलेले १ उमेदवार तसेच महाराष्ट्र वन सेवा परिक्षा २०१४ च्या आधारे सरळसेवेने नियुक्ती देण्यासाठी शिफारस करण्यात आलेले १० उमेदवार असे एकुण ११ उमेदवार केंद्रीय अकादमी, राज्य वनसेवा डेहराडून येथील २ वर्षाचे प्रशिक्षण पुर्ण करुन दि.१४/०३/२०१८ रोजी शासनसेवेत दाखल होत आहेत. सदर ११ उमेदवारांना पदस्थापना देण्याचा प्रस्ताव अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (कार्मिक), नागपूर यांनी संदर्भाधीन पत्रान्वये शासनास सादर केला आहे.

२. त्यानुषंगाने खालील उमेदवारांना सहायक वनसंरक्षक, गट-अ (कनिष्ठ श्रेणी) रु. ९३००- ३४८०० + ग्रेड पे रु.५००० या वेतनश्रेणीत एक वर्षाच्या परिविक्षाधीन कालावधीसाठी व त्यानंतर त्याच पदावर नियमित पदस्थापनेसाठी त्यांच्या नावासमोर स्तंभ क्र.४ मधील दर्शविलेल्या पदावर पदस्थापना देण्यात येत आहे :-

अ. क्र.	उमेदवाराचे नाव	महसूली विभाग	पदस्थापना	शेरा
१	२	३	४	५
१	कु. प्रिया राजेंद्र म्हैसकर	नागपूर	उपविभागीय वन अधिकारी, नवेगांव बांध नागझिरा प्रकल्प	कु. गिता पवार, सहायक वनसंरक्षक यांच्या जागी
२	श्री. महेश छगन खोरे	नागपूर	सहाय्यक वनसंरक्षक (जंकास,जमीन व कॅम्पा) कोअर ता.अं.व्या.प्र. चंद्रपूर	रिक्त पदी
३	श्री. उत्तम महादेव फड	अमरावती	सहाय्यक वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण, वाशिम	रिक्त पदी
४	श्री. गणेश निवृत्ती पाटोळे	अमरावती	सहाय्यक वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण, अमरावती	रिक्त पदी
५	श्री. अनंता नामदेव डिगोळे	अमरावती	सहाय्यक वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण, यवतमाळ	रिक्त पदी

अ. क्र.	उमेदवाराचे नाव	महसूली विभाग	पदस्थापना	शेरा
१	२	३	४	५
६	श्री. अमोल गौराम जाधव	नागपूर	सहाय्यक वनसंरक्षक (जंकास, जमीन व कॅम्पा) बफर ता.अं.व्या.प्र. चंद्रपूर	रिक्त पदी
७	श्री. संदिप बाबू चव्हाण	अमरावती	सहाय्यक वनसंरक्षक (वन्यजीव), किनवट जि.यवतमाळ	श्री.जे.जे.चिंचोलकर, सहायक वनसंरक्षक यांच्या जागी
८	कु. मुक्ताबाई विश्वनाथ टेकाळे	नागपूर	सहाय्यक वनसंरक्षक (जंकास) गडचिरोली स्थित धानोरा	रिक्त पदी
९	श्री. श्रीनिवास लिंगन्ना लखमवाड	नागपूर	सहाय्यक वनसंरक्षक (तेंदू) चंद्रपूर	रिक्त पदी
१०	कु. रामेश्वरी अशोक बोगांळे	नागपूर	सहाय्यक वनसंरक्षक (प्रादेशिक व वन्यजीव), ब्रम्हपूरी	रिक्त पदी
११	कु. निकिता जयराम चौरे	नागपूर	सहाय्यक वनसंरक्षक (प्रादेशिक व कॅम्पा), वर्धा	रिक्त पदी

३. उपरोक्त उमेदवारांना ज्या विभागात नियुक्ती देण्यात आलेली आहे, त्या विभागात हजर होण्यासाठी प्रशिक्षण कालावधी पुर्ण झाल्यानंतर, त्यांनी तात्काळ अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (कार्मिक), नागपूर यांच्या कार्यालयाशी संर्पक साधावा. सदरहू उमेदवार तात्काळ नियुक्तीच्या ठिकाणी हजर झाले नाहीत, तर त्यांना सदर नियुक्तीमध्ये स्वारस्य नाही असे गृहित धरुन शासनस्तरावरुन त्यांची नियुक्ती रद्द करण्यात येईल.

४. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (कार्मिक), नागपूर यांनी संबंधित उमेदवारांच्या नियुक्ती संदर्भातील पुढील कार्यवाही करावी व सदर उमेदवारांच्या नियुक्तीचा दिनांक तसेच जे उमेदवार विहीत मुदतीत हजर होणार नाहीत त्यांचेबाबतचा अहवाल शासनास anil.dhas@nic.in या ई-मेल संकेतस्थळावर त्वरीत सादर करावा.

५. कु. गिता पवार, सहायक वनसंरक्षक व श्री.जे.जे.चिंचोलकर, सहायक वनसंरक्षक यांच्या बदलीने पदस्थापनेचे आदेश स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील. तथापि त्यांच्या नियत्रंक अधिका-यांनी सदर आदेश प्राप्त होताच त्यांना तात्काळ कार्यमुक्त करून सरळसेवेच्या अधिकाऱ्यांना रूजू करून घ्यावे.

६. सदर शासन आदेश, महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संकेतांक २०१८०३०९१७२९४१४३१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Atul Ashok Kode

Digitally signed by Atul Ashok Kode
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a12403ed93b05957cb29b7e95265d3ac52d366233b80405514f23a879132aeec, serialNumber=f0d5ee4c99cc9cbfa8761b3ddc7bd6650bad33302f33a35400ad5aad2291371a, cn=Atul Ashok Kode
Date: 2018.03.09 17:31:05 +05'30'

(अतुल कोदे)
सह सचिव (वने)
महसूल व वन विभाग

प्रति,

१. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य,नागपूर.

२. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर
३. प्रधान मुख्य वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण संचालनालय, म. रा. पुणे
४. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (कार्मिक), नागपूर.
५. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन - दुय्यम संवर्ग), नागपूर.
६. सर्व मुख्य वनसंरक्षक / सर्व वनसंरक्षक (प्रादेशिक / वन्यजीव).
७. सचिव महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई (पत्राने).
८. मा.मंत्री (वने) यांचे खाजगी सचिव
९. मा.राज्यमंत्री (वने) यांचे खाजगी सचिव
१०.सचिव (वने) यांचे स्वीय सहाय्यक
११.महालेखापाल,महाराष्ट्र - २ (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता),महाराष्ट्र -२, नागपूर
१२.जिल्हा कोषागार अधिकारी,गोंदिया,चंद्रपूर,वाशिम,अमरावती,यवतमाळ,गडचिरोली,वर्धा.
१३.वन विभागातील सर्व कार्यासने
१४.निवड नस्ती (फ-८ कार्यासन) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (कार्मिक), नागपूर यांना विनंती करण्यात येते की, सदर आदेशाची प्रत संबंधित उमेदवारांना तात्काळ उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही करावी.